# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

टेलि. : २४०१०४३७
२४०२०७८१
२४०१४७०१
फॅक्स : २४०२ ४०६८
Visit us at : http://mpcb.mah.nic.in

कल्पतरु पॉईंट, २/३/४ था माळा,
सिने प्लॅनेटसमोर,
सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व),
मुंबई - ४०० ०२२.

## माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या ॲपेलेट ऑथॉरिटीसमोर

अपिल क्रमांक ७/२०११

सुनावणी दिनांक ०७/०५/२०११

श्री किशोर बापूराव टाकणे
सह्याद्री को.ऑप.हौ.सोसायटी,
बी.नं.सी-२, रुम नं.२/३, ८ बी,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४ — अपिल करणार

विरुध्द

माहिती अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
मुंबई — प्रतिवादी

प्रत मिळाली
६/०५/११

## आदेश

अपिल करणार यांनी दिनांक ९/३/२०११ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यानंतर, सहाय्यक माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकारी यांच्या निर्देशाप्रमाणे, दिनांक ११/३/२०११ च्या पत्राद्वारे सदरहू माहिती वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी,मप्रनि मंडळ यांच्याकडून मागितलेली होती. त्याचवेळी दिनांक १८/४/२०११ रोजी माहिती अधिकारी, मप्रनि मंडळ यांनी अपिलातील मुद्यांबाबत खालीलप्रमाणे माहिती दिली.

**मुद्दा क्र.१ ते ५** :सदरहू मुद्यांबाबत वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, मप्रनि मंडळ यांनी माहिती देताना सदरहू मुद्दे प्रश्नार्थक असल्यामुळे, माहिती देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे दिनांक १८/४/२०११ च्या पत्राद्वारे सहाय्यक माहिती अधिकारी, मप्रनि मंडळ यांना स्पष्टपणे कळविले होते.

सदरहू दिनांक १८/४/२०११ रोजीच्या पत्राद्वारे असेही स्पष्ट करण्यास आले होते की, अपिल करणार यांनी मा.लोकआयुक्त कार्यालयाकडे त्यावेळी तत्कालीन सदस्य सचिव, मप्रनि मंडळ यांनी दिनांक ३/२/२०१० रोजी सुनावणीसाठी गेले असताना, त्यांच्या माहितीसाठी एक टिप्पणी तयार करुन दिलेली होती. त्या टिप्पणीस अहवाल समजून अपिल करणार यांनी अनाठायी प्रश्न तयार करुन, माहितीच्या अधिकारांतर्गत माहिती मागितलेली आहे व ते जाणुनबुजून माहितीचा अधिकारी अधिनियमांचा गैरवापर करीत असल्याचे दिसून येत आहे, असे स्पष्ट केले व सोबत तत्कालीन सदस्य सचिव,मप्रनि मंडळ यांच्याकडे दिलेल्या टिप्पणीची छायाप्रत त्यांनी दिनांक १८/४/२०११ च्या पत्रासोबत जोडलेली होती.

अपिल करणार यांनी अनाठायी प्रश्न तयार करुन, माहितीच्या अधिकारांतर्गत माहिती मागितलेली आहे व ते जाणुनबुजून माहितीचा अधिकारी अधिनियमांचा गैरवापर करीत असल्याचे दिसून येत आहे, या म्हणण्याबाबत अपिल करणार यांनी हरकत घेतली की, आजतागायत त्यांनी केलेल्या अनेक अर्जांची माहिती वेळेत न मिळाल्यामुळे, प्रत्येक वेळी त्यांना अपिल दाखल करुन, त्यानंतरच अर्धवट माहिती देण्यात आलेली आहे. त्यामुळे, अपिल करणार यांनी माहितीचा अधिकारी अधिनियमांचा गैरवापर करीत असल्याचे म्हणणे चुकीचे आहे.

अपिल करणार यांनी असे स्पष्ट केले की, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, मप्रनि मंडळ यांनी त्यांना अथवा माहिती अधिकारी, मप्रनि मंडळ यांना विहित वेळेमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. अपिल करणार यांनी असेही स्पष्ट केले की, लोक आयुक्त कार्यालयाकडून सदरहू कागदपत्रास अहवाल संबोधिल्यामुळे, त्यांनी माहिती अधिकारात मप्रनि मंडळातर्फे अहवाल सादर केला किंवा नाही ? ही माहिती मिळण्याकरिता त्यांना लोक आयुक्त कार्यालयाकडून साक्षांकित करुन मिळालेल्या कागदपत्रांच्या प्रती अर्जाबरोबर जोडून माहिती मागितलेली होती. त्यामुळे, मुददा क्र.१ बाबत असा अहवाल मप्रनि मंडळाने लोकआयुक्त कार्यालयात दिली किंवा नाही दिला?, एवढीच माहिती अपेक्षीत होती.

आस्थापना शाखेस विचारणा केली असता, सदरहू कागदपत्र टिप्पणी स्वरुपात तत्कालीन सदस्य सचिव, मप्रनि मंडळ यांना मा.लोकआयुक्तांसमोरील दिनांक ३/२/२०१० रोजीच्या सुनावणीसाठी देण्यात आलेले होते व ती केवळ टिप्पणी होती, अहवाल नव्हता, असे स्पष्ट करण्यात आलेले आहे.

मुद्दा क्र.२ बाबत, आस्थापना शाखेने सदरहू कागदपत्र हे अहवाल नसल्यामुळे आणि टिप्पणी असल्यामुळे, सदरहू माहिती लागू होत नाही असे स्पष्ट केले. त्याबाबत कोणतेही शासकीय नियम नसून, कार्यालयाची मुद्रा उमटवणे, जबाबदार अधिका-याची स्वाक्षरी नसणे, लेटरहेडवर माहिती न देणे, जावक क्रमांक नसणे या बाबी लागू होत नाहीत.

मुद्दा क्र.३ बाबत आस्थापना शाखेकडून असे स्पष्ट करण्यात आले की, केवळ टिप्पणी म्हणून सदरहू कागदपत्र तत्कालीन सदस्य सचिव, मप्रनि मंडळ यांना दिलेले होते, जे त्यांनी मा.लोकआयुक्तांना टिप्पणी स्वरुपातच दिले. त्यामुळे त्याबाबतचे ठोस पुरावे साक्षांकित करुन देणे शक्य नाही.

मुद्दा क्र.४ बाबत आस्थापना शाखेकडून असे स्पष्ट करण्यात आले की, सदरहू अहवाल नसून, टिप्पणी स्वरुपात मा.लोकआयुक्तांना तत्कालीन सदस्य सचिव, मप्रनि मंडळ यांनी दिलेली माहिती होती. त्यामुळे मा.लोकआयुक्तांना अहवाल सादर करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

मुद्दा क्र.५ बाबत वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, मप्रनि मंडळ यांच्यातर्फे असे स्पष्ट करण्यात आले की, बनावट अभिलेख कायदयानुसार शासनाची दिशाभूल, फसवणुक करणे हे फौजदारी गुन्ह्यास पात्र असते, ही बाब सदरहू टिप्पणीस लागू होत नाही. कारण सदरहू टिप्पणी ही अहवाल म्हणून सादर केलेली नाही. सदरहू टिप्पणी ही, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, मप्रनि मंडळ श्री शि.रा. बानाटे यांनी केलेली होती. कोणत्या कागदपत्रांच्या आधारे सदरहू टिप्पणी वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी बनविली हे दस्तऐवज मूळ नस्ती सचिव, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे पत्र क्र.मप्रनि/आस्था-१, दिनांक १५/१/२०११ रोजीच्या पत्राद्वारे पाठविलेली असल्यामुळे, उपलब्ध नाही.

वरील परिस्थितीमध्ये अपिल निकाली काढण्यात येत आहे.

दिनांक ७/५/२०११ रोजी मुंबई येथून,

( द. त्रि. देवळे )
अपिलीय अधिकारी